**संक्षिप्त फौजदारी खटला क्रं. १३३५०/२०२४**

**निशाणी :**

**आरोपीचे निवेदन**

| | |
|---|---|
| **१. अपराधाचा दिनांक** | : २३.०६.२०२४ रोजी |
| **२. फिर्याद / दाखल दिनांक** | : १६.०७.२०२४ रोजी |
| **३. फिर्यादीचे नाव** | : औरंगाबाद जिल्हा आदर्श महिला नागरी पतसंस्था शाखा सातारा परिसर, औरंगाबाद तर्फे माहितगार इसम. |
| **४. आरोपीचे नाव** | : सुमित्रा शंकरराव जाधव<br>वय : सज्ञान, धंदाः गृहिणी,<br>रा. फ्लॅट क्र. १९, श्री. रेसिडेन्सी,<br>गट क्र. ९४ देवळाई परिसर, औरंगाबाद |

**५. गुन्हयाचा तपशिल :**

फिर्यादी ही संबंधित कायद्यानुसार स्थापन झालेली संस्था आहे. तुम्ही व विलास राघोजी जाधव यांनी मिळून फिर्यादी संस्थेकडून रक्कम रुपये ९५,०००/- चे कर्ज घेतले. तुम्ही कर्ज रक्कम विहीत मुदतीत परतफेड केली नाही. त्यानंतर तुम्ही कर्ज रक्कम परतफेड करण्याकरीता तुमचे खातेवरील धनादेश क्र. १६७७०६ हा रक्कम रुपये ८९,३३३/- रक्कमेचा धनादेश दि.०९.०५.२०२४ रोजी फिर्यादीला दिला. फिर्यादीने सदरचा धनादेश त्याचे बँक खात्यात दि.०९.०५.२०२४ रोजी भरला असता तो धनादेश दि.१०.०५.२०२४ रोजी न वटता अपुरा निधी या कारणाखाली परत आला. त्यानंतर दि.०५.०६.२०२४ रोजी फिर्यादीने तुम्हाला कायदेशीर नोटीस पाठवली. सदरची नोटीस तुम्हाला दिनांक ०७.०६.२०२४ रोजी मिळाली. परंतु त्यानंतर देखील १५ दिवसांचे आत धनादेशाची रक्कम देण्याबाबत तुम्ही तजवीज केली नाही. त्यामुळे तुम्ही फिर्यादीस न वटणारा धनादेश देऊन त्याद्वारे निगोशिएबल इन्स्ट्रुमेंट ॲक्ट कलम १३८ अन्वये शिक्षेस पात्र गुन्हा या न्यायालयाच्या कार्यक्षेत्रात केला.

**आरोपीचे निवेदन :**

१. तुम्हाला खटल्यातील नकला मिळाल्यात काय ?

उत्तर : नाही

२. तुम्हाला आता वाचून दाखवलेला गुन्हयाचा तपशील समजला काय ?

उत्तर : होय

०१/१०/२४

३. तुम्हाला गुन्हा कबूल आहे काय ?

उत्तर : नाही

...............................

**आरोपीची सही**

**माझ्या समक्ष**

01/10/2024

**दिनांक : ०१.१०.२०२४**

**ठिकाण : औरंगाबाद**

**(समीर गोपाळ गुणारी)**

**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,**

**(न्यायालय क्र.१९) औरंगाबाद**